पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५५४/२०१९
दिनांक : १३/१२/२०१९

प्रति,

मा.......................................
सदस्य, शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा दिनांक **१९/१२/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक १९/१२/२०१९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2018-19 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.शिक्षण समिती सभा

**कार्यपत्रिका क्रमांक – ०९**

**दिनांक : १९/१२/२०१९** **वेळ : दुपारी २.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१९/१२/२०१९** रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड म.न.पा. शिक्षण विभागाच्या वतीने सालाबाद प्रमाणे दि.०५ सप्टेंबर २०१९ चा शिक्षक दिन कार्यक्रम दि.१२ सप्टेंबर २०१९ रोजी वार गुरूवार सकाळी १०.०० वाजता प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे आयोजित करणेत आलेला होता. सदर कार्यक्रमास आदर्श शाळा व गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आले होते. शिक्षक दिन साजरा करणेकामी किरकोळ खर्चाकरिता र.रू.६०,०००/- चे अग्रिम घेण्यात आले होते. तसेच सदर कार्यक्रमामध्ये सत्कारार्थी यांना द्यावयाचे सन्मानचिन्हे / स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र व निमंत्रण पत्रिका वेदपाठक क्रिसीएशन यांचेमार्फत थेट पध्दतीने घेण्यात आलेले असून याकरिता एकूण र.रू.४७,३५०/- इतका खर्च झालेला आहे. शिक्षक दिन कार्यक्रमास एकूण र.रू.१,०७,३५०/- इतका खर्च झालेला आहे. तरी कार्यक्रमास झालेला एकूण खर्च र.रू.१,०७,३५०/- (अक्षरी र.रु. एक लाख सात हजार तीनशे पन्नास फक्त) यांस कार्योत्तर मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.



**(उल्हास बबनराव जगताप)**

**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय

क्रमांक : नस/४/कावि/५५४/२०१९

दिनांक : १३/१२/२०१९ चे लगत.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.